## पिंपरी चिंचवड महानगरपालिका, रहाटणी, पुणे – १७

मा. ड प्रभाग समिती,

कार्यपत्रिका क्र. १३

सभावृत्तांत

दिनांक ०१/०३/२०१९ दुपारी १२.०० वा.

पिपरी चिंचवड महानगरपालिका मा. ड प्रभाग समितीची माहे मार्च २०१९ ची नियमित मासिक सभा शुक्रवार दिनांक ०१/०३/२०१९ रोजी दुपारी १२.०० वा. ड क्षेत्रिय कार्यालयाच्या " छत्रपती शाहू महाराज सभागृह" येथे आयोजीत करण्यात आली होती. सदर सभेस खालीलप्रमाणे सन्माननीय सदस्य उपस्थित होते.

| | | |
|---|---|---|
| १) | मा. श्री. कदम शशिकांत गणपत | सभापती |
| २) | मा. श्री. कामठे तुषार गजानन | सदस्य |
| ३) | मा. श्रीमती चोंधे आरती सुरेश | सदस्या |
| ४) | मा. श्री. बापु उर्फ शत्रुघ्न सिताराम काटे | सदस्य |
| ५) | मा. श्रीमती कुटे निर्मला संजय | सदस्या |
| ६) | मा. श्री. आंगोळकर सागर सुनिल | सदस्य |
| ७) | मा. श्रीमती मुंढे उषा अंकुश | सदस्या |
| ८) | मा. श्रीमती लोखंडे चंदा राजू | सदस्या |

---------

तसेच खालीलप्रमाणे नामनिर्देशित सदस्य बैठकीस उपस्थित होते.

१) मा. श्री. भुमकर चंद्रकांत बाबुराव

--------

याशिवाय सभेस मा.सिताराम बहुरे, प्रशासन अधिकारी तथा सचिव, सभा शाखा, मा. देवण्णा गट्टुवार, कार्यकारी अभियंता स्थापत्य, मा. बाबासाहेब गलबले, कार्यकारी अभियंता, विद्युत, मा. प्रशांत पाटील, कार्यकारी अभियंता, जलनि:सारण, मा. सुनिल पाटील, उपअभियंता, स्थापत्य, मा. माधव सोनवणे, उपअभियंता, विद्युत, मा. भाऊसाहेब साबळे, उपअभियंता, पाणीपुरवठा, मा.सुनिल नरोटे, उपअभियंता, स्थापत्य उद्यान, मा. सुपे अरुण, प्र. लेखाधिकारी, मा. विनोद बेंडाळे, सहा. आरोग्याधिकारी, मा. एस.एस. गायकवाड, मुख्य आरोग्य निरीक्षक, मा. मोरे सुधीर , मा. एस.एच. खोत, मा. वर्षा कदम, कनिष्ठ अभियंता, स्थापत्य, मा. कावळे एम.डी., मा. भालेराव एस.डी., कनिष्ठ अभियंता विद्युत, मा. बी.एम. मुलाणी, मा. जयवंत रोकडे, मा. संदीप पाडवी, मा. ढोले बी.आर. कनिष्ठ अभियंता, जलनि:सारण, मा. मनोज बोरसे, मा. सी.एम. कुंभार, साकेत पावरा, कनिष्ठ अभियंता, पाणीपुरवठा,

मा.आर.एम. सौदाई, मा. मोरे शशिकांत, एम., मा.कोतवडेकर संदीप, मा. सरोदे व्ही.एस., मा. अतुल सोनवणे, आरोग्य निरीक्षक, मा. गेंगजे व्ही.एस., क्रीडा निरीक्षक, मा. भक्तीप्रसाद तरवडे, मुख्य लिपीक, अतिक्रमण विभाग, मा.डी.एम. कोटीयाना, आरोग्य निरीक्षक, पशूवैद्यकीय विभाग, मा. ए.पी. मद्रासी, मलेरिया इन्सपेक्टर, मा. जे.व्ही. पटेल, सहा. उद्यान अधिक्षक, मा. दुदुसकर एस.एस., खैरे जी.एन. उद्यान सहाय्यक, इ. अधिकारी उपस्थित होते.

-----------

**प्रशासन अधिकारी तथा सचिव** : माहे मार्च २०१९ च्या दि. १/०३/२०१९ रोजीचे मासिक सभेचे कामकाज सुरु करण्यास मान्यता मिळावी.

**मा.सभापती** : आजच्या सभेचे कामकाज सुरु करण्यास मान्यता देणेत येत आहे.

**मा. सचिव, सभा शाखा** : मागील सभा कार्यपत्रिका क्र. १० माहे जानेवारी २०१९, कार्यपत्रिका क्र. ११ माहे फेब्रुवारी २०१९ व कार्यपत्रिका क्र. १२ विशेष प्रभाग समिती सभा यांचे सभावृत्तांत कायम करणेस मान्यता मिळावी.

**मा. सभापती** : मागील सभा कार्यपत्रिका क्र. १० माहे जानेवारी २०१९, कार्यपत्रिका क्र. ११ माहे फेब्रुवारी २०१९ व कार्यपत्रिका क्र. १२ विशेष प्रभाग समिती सभा यांचे सभावृत्तांत कायम करणेस मान्यता देणेत येत आहे.

**मा. सचिव, सभा शाखा** :- सन्मा. सदस्यांनी सादर केलेले ऐन वेळचे विषय दाखल करुन घेणेकामी मान्यता मिळावी.

**मा. सभापती** :– सन्मा. सदस्यांनी सादर केलेले ऐन वेळचे विषय दाखल करुन घेणेत येणेकामी मान्यता आहे.

तदनंतर माहे मार्च २०१९ च्या नियमित सभेचे कामकाज सुरु करण्यात आले व सन्मा. सदस्यांनी मागणी केलेप्रमाणे व मा. सभापती यांचे मान्यतेने ऐन वेळचे विषय दाखल करुन घेण्यात आले.

**विषय क्र. १** : प्रभाग क्र. २६ मधील पिंपळे निलख येथे नव्याने होत आहे. उद्यानास शहीद अशोक कामटे यांचे नाव दिल्यास त्यांच्या कार्याची माहिती नागरीकांना होईल. ते रक्षक सोसायटी पिंपळे निलख येथील रहिवाशी असल्याने सदर उद्यानाला त्यांचे नाव दिल्यास पिंपळे निलख वासियांच्या वतीने ती त्यांना श्रध्दांजली ठरेल.सदर बाब विचारात घेऊन सदर उद्यानास“ शहीद अशोक कामटे उद्यान” असे नाव देणेबाबत

**विषय क्र.** २ : प्रभाग क्र. २८ पिंपळे सौदागर (पेट्रोल पंपासमोरील) रस्त्याला “कै. धोंडिबा नामदेव जाचक पथ, स.नं. ४/१ गंगाई चौक” असे नामकरण करणेबाबत

**विषय क्र. ३** : प्रभाग क्र. २९ पिंपळे गुरव येथील काशिद पार्क येथे दत्तमंदिराच्या परिसराला "दत्त मंदिर चौक" असे नामकरण करणे

**विषय क्र.** ४ : प्रभाग क्र. २९ पिंपळे गुरवयेथील स.नं. ९३ या ठिकाणी वैदू समाज शव दफनभूमी साठी ३०१.७५ चौ.मी. (३२४६.८३ चौ.फुट) व मुस्लिम समाज शव दफन भूमीसाठी ३४५.४५ चौ.मी. (३७१७.०४ चौ.फुट) सुरु करण्याबाबत मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ च्या कलम ३२४ अन्वये मान्यता देणेत आली आहे. त्यानुसार स.नं. ९३ येथील दफनभुमीचे कामही सुरु आहे. तरी सदर दफनभूमीला "वैदू समाज दफन भूमी ३०१.७५ चौ.मी. (३२४६.८३ चौ.फुट)" असे नामकरण करणे

**तदनंतर विषयपत्रिकेवरील खालील विषयांवर मान्यता देणेत आली.**

विषय क्र. १ ठराव क्र. ४२

दिनांक: ०१/०३/२०१९ विभाग : स्थापत्य विभाग

सुचक : मा.संदीप अरुण कस्पटे अनुमोदक : मा.तुषार गजानन कामठे

संदर्भ : मा. संदीप अरुण कस्पटे यांचेकडील दिनांक ०८/०१/२०१९ चा प्रस्ताव

प्रभाग क्र. २६ वाकड –पिंपळे निलख मौजे वाकड सर्व्हे नं. २०७ छत्रपती चौकाकडून उजवीकडे वळताना उजवी बाजू म्हातोबा चौकाकडे जाताना जी पहिली कॉलनी आहे त्या कॉलनीस "यशवंती कॉलनी कस्पटे वस्ती" हे नाव तेथील रहिवाशी यांच्या मागणीनुसार देणेबाबतचे प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मंजूर झाला.

-----------

विषय क्र. २ ठराव क्र. ४३

दिनांक: ०१/०३/२०१९ विभाग : स्थापत्य विभाग

सुचक : मा.संदीप अरुण कस्पटे अनुमोदक : मा.तुषार गजानन कामठे

संदर्भ : मा. संदीप अरुण कस्पटे यांचेकडील दिनांक ०८/०१/२०१९ चा प्रस्ताव

प्रभाग क्र. २६ वाकड –पिंपळे निलख मौजे वाकड सर्व्हे नं. २०७ छत्रपती चौकाकडून उजवीकडे वळताना उजवी बाजू म्हातोबा चौकाकडे जाताना जी दुसरी कॉलनी आहे त्या कॉलनीस "शिवतांडव कॉलनी कस्पटे वस्ती" हे नाव देणेबाबतचे प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मंजूर झाला.

------------

**तदनंतर सन्मा. सदस्यांनी सादर केलेप्रमाणे व मा. सभापती यांचे मान्यतेने दाखल करुन घेण्यात आलेल्या ऐन वेळचे विषयांवर खालील प्रमाणे मान्यता देणेत आली.**

विषय क्र. ३ ठराव क्र. ४४

दिनांक: ०१/०३/२०१९ विभाग : स्थापत्य उद्यान विभाग

सुचक : मा.तुषार गजानन कामठे अनुमोदक : मा. उषा अंकुश मुंढे

संदर्भ : मा. तुषार गजानन कामठे यांचेकडील दिनांक ०१/०३/ २०१९ चा प्रस्ताव

प्रभाग क्र. २६ मधील पिंपळे निलख येथे नव्याने होत असलेल्या उद्यानास शहीद अशोक कामटे यांचे नाव दिल्यास त्यांच्या कार्याची माहिती नागरीकांना होईल. ते रक्षक सोसायटी पिंपळे निलख येथील रहिवाशी असल्याने सदर उद्यानाला त्यांचे नाव दिल्यास पिंपळे निलख वासियांच्या वतीने ती त्यांना श्रध्दांजली ठरेल.सदर बाब विचारात घेऊन सदर उद्यानास "शहीद अशोक कामटे उद्यान" असे नाव देणेबाबतचे प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मंजूर झाला.

---------

विषय क्र. ४ ठराव क्र. ४५

दिनांक: ०१/०३/२०१९ विभाग : स्थापत्य विभाग

सुचक : मा. निर्मला संजय कुटे अनुमोदक : मा. बापू उर्फ शत्रुघ्न सिताराम काटे

संदर्भ : मा. निर्मला संजय कुटे यांचेकडील दिनांक ०१/०३/ २०१९ चा प्रस्ताव

प्रभाग क्र. २८ पिंपळे सौदागर (पेट्रोल पंपासमोरील) रस्त्याला "कै. धोंडिबा नामदेव जाचक पथ, स.नं. ४/१ गंगाई चौक" असे नामकरण करणेबाबतचे प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मंजूर करण्यात आला.

---------------

विषय क्र. ५ ठराव क्र. ४६

दिनांक: ०१/०३/२०१९ विभाग : स्थापत्य विभाग

सुचक : मा.सौ. उषा अंकुश मुंढे अनुमोदक : मा. सागर सुनिल आंगोळकर

संदर्भ : मा.उषा अंकुश मुंढे यांचेकडील दिनांक ०१/०३/ २०१९ चा प्रस्ताव

प्रभाग क्र. २९ पिंपळे गुरव येथील काशिद पार्क येथे दत्तमंदिराच्या परिसराला "दत्त मंदिर चौक" असे नामकरण करणेचे प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मंजूर करण्यात आला.

-------------

विषय क्र. ६ ठराव क्र. ४७

दिनांक: ०१/०३/२०१९ विभाग : स्थापत्य विभाग

सुचक : मा.सौ. चंदा राजू लोखंडे अनुमोदक : मा. उषा अंकुश मुंढे

संदर्भ : मा. चंदा राजू लोखंडे यांचा दि. १/३/२०१९ यांचा दि. १/३/२०१९ चा प्रस्ताव

प्रभाग क्र. २९ पिंपळे गुरवयेथील स.नं. ९३ या ठिकाणी वैदू समाज शव दफनभूमी साठी ३०१.७५ चौ.मी. (३२४६.८३ चौ.फुट) व मुस्लिम समाज शव दफन भूमीसाठी ३४५.४५ चौ.मी. (३७१७.०४ चौ.फुट) सुरु करण्याबाबत मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ च्या कलम ३२४ अन्वये मान्यता देणेत आली आहे. त्यानुसार स.नं. ९३ येथील दफनभुमीचे कामही सुरु आहे. तरी सदर दफनभूमीला "वैदू समाज दफन भूमी ३०१.७५ चौ.मी. (३२४६.८३ चौ.फुट)" असे नामकरण करणेचे प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मंजूर करण्यात आला.

------------

तदनंतर सन्मा. सदस्यांनी पाणीपुरवठा, स्थापत्य, उद्यान. स्थापत्य उद्यान, स्टॉर्म वॉटर ड्रेनेज, जलनि:सारण, पशू वैद्यकीय विभाग, विभागांचे कामकाजाबाबत नाराजी व्यक्त केली. पाणीपुरवठा विभागाकडील अनियमित पाणीपुरवठा व अमृत योजनेची माहिती सदस्यांना देणेसाठी अधिकारी उपस्थित नसलेबाबत, प्रभागातुन देणेत येणा-या फ्लेक्स परवानगी कामकाजास अनुसरुन परवानगी देणेत आल्यानंतर प्रत्यक्षात जागेवर जावून शहानिशा करणेसंदर्भात, आरोग्य विभागाकडील पवना नदीतील वाढत्या जलपर्णीमुळे होणा-या डासांच्या उपद्रवाबाबत तसेच जलपर्णी काढण्याच्या कामकाजाबाबत तसेच रस्त्यावर राडा रोडा टाकणा-या दुकानदार नागरीकांवर कारवाई, अतिक्रमण इ. बाबींबाबत नाराजी व्यक्त करण्यात आली.

मा. सभापती : माहे मार्च २०१९ चे सभेस उपस्थित अधिकारी यांचे व सर्व सन्मा. सदस्यांचे आभार मानुन तसेच सन्मा. सदस्यांनी सभेमध्ये विविध विभागांचे कामकाजास अनुसरुन नाराजी व्यक्त केली आहे व सूचना दिल्या आहेत त्या अनुषंगाने आवश्यक ती कार्यवाही करावी असे आदेश देऊन माहे मार्च २०१९ ची मासिक सभा संपल्याचे जाहीर करतो.

सही/-
सभापती,
ड प्रभाग समिती,रहाटणी,
पुणे - ४११०१७

सही/-
प्रशासन अधिकारी,
ड क्षेत्रिय कार्यालय, रहाटणी,
पुणे ४११०१७

क्र. डक्षे/१३/कावि/१८/२०१९
दि. ०८/०३/२०१९